**नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०१२ मधील नि.क्र.११७ वरील आदेश**
**(वसंत वि. शशिकांत व इतर )**

वादीने सदरचा अर्ज (नि.क्र.११७) हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करीता दाखल केला आहे.

२. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, वादीने प्रस्तुत प्रकरणात त्याच्या मागणीप्रमाणे दाव्याची योग्य ती आकारणी केली नव्हती व योग्य ते न्यायालयीन शुल्क दिलेले नव्हते. त्यामुळे वादी दावा आकारणी व न्यायालयीन शुल्क बाबत दाव्यामध्ये दुरुस्ती करु इच्छीत आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दावा कायमस्वरुपी निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीने सदर दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी विनंती केली आहे. प्रतिवादीने त्यावर त्याचे म्हणणे दाखल केले आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठरावासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादींनी त्याच्या दाव्यात केलेली मागणी पाहता वादीने दाव्याची योग्य ती आकारणी केली नसल्याचे व योग्य ते न्यायालयीन शुल्क दिले नसल्याचे निदर्शनास आले होते व त्या अनुषंगाने नि.क्र.११० चे अर्जावरील आदेशानुसार वादीला दाव्याची योग्य ती आकारणी करण्यासाठी व न्यायालयीन शुल्क देण्यासाठी निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने वादीने दाव्याची योग्य ती आकारणी केली आहे व न्यायालयीन शुल्क दिले आहे. त्याबाबतचा मजकूर वादीला दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्ती ही योग्य व गरजेची वाटते. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास पक्षकारांमधील वाद विषयाचे संपुर्णपणे निराकरण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेला अर्ज व त्यातील कथने योग्य व संयुक्तीक वाटतात. या सर्व बाबी विचारात घेता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज (नि.क्र.११७) मंजूर करण्यात येतो.

२. वादीने विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत

अभिलेखावर सादर करावी.

३. वादी व प्रतिवादींनी नोंद घ्यावी व विनाविलंब पुर्तता करावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2026.03.20 17:29:33 +0530

फलटण. (ए. एस. साटोटे)

दि. २०.०३.२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, फलटण